यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
'ज्ञानगंगोत्री', गंगापूर धरणाजवळ, नाशिक – ४२२ २२

# ज्ञानगंगोत्री

• अंक २ • सप्टेंबर २०१६–नोव्हेंबर २०१६



# ज्ञानगंगोत्री

वर्ष १७वे ज्ञानगंगोत्री : सप्टेंबर २०१६ ते नोव्हेंबर २०१६ अंक-२

ISSN 2231-6507

*अनुक्रमणिका*


| | | |
|---|---|---|
| • संपादकीय | | |
| • संशोधन कार्यात वाङ्मय चौर्य संगणकीय प्रणालीचे महत्त्व | श्री. रणजित धर्मापुरीकर | ०१ |
| • ग्रंथालयात कुशल मानव संसाधनांची गरज | श्री. हितेश ब्रिजवासी | ०७ |
| • महाविद्यालयीन ग्रंथपालांचा कार्यताण आणि व्यावसायिक बांधिलकी यांमधील सहसंबंधांचा अभ्यास | श्री. विनोद होले | १५ |
| • एन-लिस्ट कन्सोर्शिया : महाविद्यालयीन ग्रंथालयांसाठी वरदान | कु. पूनम हेरोळे<br>श्री. राहुल खंडारे | २८ |
| • विद्यावाचस्पती विद्यार्थ्यांमध्ये संशोधनासाठी संदर्भ स्रोतांचे उपयोजन क्षमता विकसन : एक प्रयोग | डॉ. संजीवनी महाले<br>श्री. प्रकाश बर्वे | ४३ |
| • दि एशियाटिक सोसायटी ग्रंथालय, मुंबई : उपलब्ध बौद्ध हस्तलिखितांचा अभ्यास | डॉ. सुनील धिवार | ५३ |
| • अजून ताजा वास जुन्याला | श्री. म. पिंगे | ६१ |

# विद्यावाचस्पती विद्यार्थ्यांमध्ये संशोधनासाठी संदर्भ स्त्रोतांचे उपयोजन क्षमता विकसन एक प्रयोग

**डॉ. संजीवनी राजेश महाले**
प्र. संचालक आणि सहयोगी प्राध्यापक
शिक्षणशास्त्र विद्याशाखा, य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
drsanjivanišmahaleyahoo.co.in
**प्रकाश विजय बर्वे,**
सहायक ग्रंथपाल ,
य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
prakshbarve123gmail.com

*समाजातील असमाधानकारक प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी संशोधक संशोधन करतात. संशोधनाला योग्य दिशा मिळण्यासाठी पूर्वज्ञानाचा, पूर्वसंशोधनाचा आधार घेतला जातो. संदर्भ स्रोत आणि पूर्व संशोधने उपलब्ध होण्याचे महत्त्वाचे ठिकाण हे ग्रंथालय, इंटरनेट आणि वेगवेगळे डाटाबेसेस आहेत.*

*य.च.म. मुक्त विद्यापीठातील विद्यावाचस्पती विद्यार्थ्यांना विविध संदर्भ स्रोतांची माहिती आहे कां? याचा शोध घेण्यात आला. बहुतांशी विद्यार्थ्यांना विविध संदर्भ स्रोतांबाबत माहिती नव्हती. त्याचप्रमाणे संशोधन प्रक्रियेबाबतही ते अनभिज्ञ होते. या विद्यार्थ्यांसाठी पाच दिवसांचे संशोधन मार्गदर्शन उद्बोधन सत्र घेण्यात आले. उद्बोधन सत्रापूर्वी या विद्यार्थ्यांना संबंधित साहित्याचा आढावा घ्यावा लागतो इतकीच माहिती होती. विषयनिहाय विविध डाटाबेसेस उपलब्ध आहेत. संदर्भाची एपीए पद्धतीने नोंद करावी लागते. संदर्भ साहित्याचा शोध घेण्यापूर्वी संशोधनातील महत्त्वाचे शब्द निश्चित करावे लागतात याबाबत सविस्तर माहिती नव्हती. आशयज्ञान चाचणीतून संदर्भाबद्दल सखोल माहिती नाही हे आढळून आले.*

***संशोधनात संदर्भ स्रोतांचा वापर क्षमता विकसित करण्यासाठी एक संपूर्ण दिवस ग्रंथालयातील विविध स्रोतांच्या वापराबाबत प्रशिक्षण घेण्यात आले. या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांना संदर्भाची मांडणी, विविध स्रोतांचा वापर कसा करावा, विविध डेटाबेसेस कसे वापरावेत्त याबाबतचे आकलन झाले. त्यानंतर त्यांनी ग्रंथालय, इंटरनेट आणि विविध डाटाबेसेसचा जाणीवपूर्वक वापर संशोधनासाठी करण्यास सुरूवात केली.***

## प्रस्तावना

संशोधनासाठी संशोधकाला पूर्वसाहित्याचा आणि पूर्वसंशोधनांचा आढावा घ्यावा लागतो. विविध स्रोत मिळण्याचे महत्त्वाचे ठिकाण हे ग्रंथालय आहे. हेतुसारही ग्रंथालयांचे विविध प्रकार दिसून येतात. लिखित साहित्याबरोबरच माहिती संप्रेषण तंत्रज्ञानामुळे विद्यार्थ्यांना इंटरनेटवरही अनेक संदर्भ उपलब्ध होतात, परंतु सर्वांनाच त्याबाबत माहिती आणि वापराबाबतचे कौशल्य नसते.

विद्यार्थ्यांमध्ये संशोधनासाठी संदर्भ शोधण्यासाठी क्षमता किती प्रमाणात आहे? संदर्भाचा शोध घेण्यासाठी त्यांना कोणकोणत्या घटकांबाबत प्रशिक्षण द्यावे लागेल, असे संशोधन प्रश्न समोर ठेवून संशोधन समस्या निश्चित करण्यात आली.

## संशोधन समस्या

य.च.म. मुक्त विद्यापीठाच्या विद्यावाचस्पती विद्यार्थ्यांमध्ये संशोधनासाठी संदर्भ उपयोजन क्षमतेचा विकास करण्यासाठी आयोजित केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या परिणामकारकतेचा अभ्यास.

## संशोधनाची उद्दिष्टे

१. विद्यावाचस्पती विद्यार्थ्यांमध्ये इंटरनेटद्वारे संदर्भांचा शोध घेण्याच्या क्षमतेचा अभ्यास करणे.

२. विद्यावाचस्पती विद्यार्थ्यांना आंतरविद्याशाखीय वातावरणात कार्य करण्याच्या क्षमतेचा शोध घेणे.

३. विद्यावाचस्पती विद्यार्थ्यांमध्ये संशोधनात पूर्वज्ञानाचा समावेश करण्याच्या क्षमतेचा शोध घेणे.



४. प्रशिक्षण कार्यक्रमानंतर विद्यावाचस्पती विद्यार्थ्यांमध्ये संदर्भ स्रोतांचे वापराबाबतचे आकलन किती प्रमाणात झाले त्याचा शोध घेणे.

## परिकल्पना

विद्यावाचस्पती विद्यार्थ्यांमध्ये संदर्भ साहित्याच्या वापराबाबतच्या प्रशिक्षण कार्यक्रमामुळे संदर्भ स्रोत शोध क्षमतेत वाढ होईल.

## संदर्भ साहित्य आढावा

राष्ट्रीय ज्ञान आयोगाने २००७ मध्ये ग्रंथालयांची भूमिका स्पष्ट केलेली आहे. त्यात त्यांनी ग्रंथालयांच्या दोन भूमिका मांडलेल्या आहेत. ग्रंथालयाने ज्ञानाचे स्थानिक केंद्र बनावे त्याचप्रमाणे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्यासाठी साहाय्य करावे. सद्यस्थितीतील ग्रंथालयांनी अधिक कृतिशील, विविध सेवा, इतर संस्थांशी सहकार्य करून समाजाभिमुख माहिती प्रणाली विकसित करणे. सीमंड पीएल (२००१) यांनी ग्रंथालयांनी विद्यार्थ्यांना इंटरनेटवर उपलब्ध असणाऱ्या विविध संदर्भांचा शोध घेण्यासाठी प्रशिक्षण द्यावे. लेंका आर. (२०१३) मते विद्यार्थ्यांना आधार देण्यासाठी ई-सर्व्हिसेस उपलब्ध करून घ्याव्यात. यातूनच मुक्त विद्यापीठातील विद्यार्थी ऑनलाईन संदर्भांचा वापर करू शकतील. महाले आणि बैद (२०१३) यांच्या मते ऑनलाईन पद्धतीने संदर्भ शोधण्याची क्षमता विकसित करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाची आवश्यकता आहे.

## संशोधन कार्यवाही

न्यादर्श प्रस्तुत संशोधनासाठी य.च.म. मुक्त विद्यापीठातील विद्यावाचस्पती शिक्षणक्रमांसाठी प्रवेश घेतलेले २८ विद्यार्थी न्यादर्श म्हणून घेण्यात आले.

## सामग्री एकत्रीकरण साधने

१. आशयज्ञान चाचणी

२. संशोधन क्षमता शोध चाचणी यात तीन विधाने संदर्भ साहित्याच्या वापरासंबंधी होते.

३. मुक्त प्रश्नांद्वारे विद्यार्थ्यांचे विमर्षण.

पाच दिवसांचा प्रशिक्षण कार्यक्रम विकसित करण्यात आला. सकाळी व्याख्यान आणि दुपारच्या सत्रात गटकार्य असे विभाजन होते. वेळापत्रक कोष्टक क्र. १ मध्ये दिलेले आहे.

कोष्टक क्र.१ : संशोधन प्रशिक्षण कार्यक्रम दिवसनिहाय कृती

| क्र. | दिवस | कृती |
|---|---|---|
| १. | पहिला | संशोधन संकल्पना, आराखडा |
| २. | दुसरा | विविध संशोधन पद्धती परिचय |
| ३. | तिसरा | संशोधन साधने, न्यादर्श निवड |
| ४. | चौथा | सांख्यिकी तंत्रांबाबत माहिती |
| ५. | पाचवा | संशोधनात संदर्भ स्रोतांचा वापर |

प्रत्येक दिवशी सकाळी विद्यार्थ्यांकडून आशयज्ञान चाचणी सोडवून घेतली जात होती. तिचे विश्लेषण करून विद्यार्थ्यांची त्या-त्या घटकांबाबतच्या ज्ञान पातळीबाबत तज्ज्ञांना माहिती दिली जात होती. तज्ज्ञ नियोजित व्याख्यान आणि विद्यार्थ्यांच्या त्या त्या आशयाबाबतच्या क्षमतेचा विचार करून यांची योग्य सांगड घालून व्याख्यान देत असत.

## सामग्री विश्लेषण आणि अन्वयार्थ

आशयज्ञान चाचणीत विद्यार्थ्यांना पुढील पाच प्रश्न विचारण्यात आले होते.

**प्रश्न १) ग्रंथालयातील संदर्भांचा शोध तुम्ही कोणत्या क्रमाने घ्याल?**

१.१) पुस्तकाचे नाव　　१.२) प्रकाशकाचे नाव

१.३) लेखक　　१.४) विषय

निरीक्षण- फक्त ३३% विद्यार्थ्यांनी लेखक, पुस्तकाचे नाव, विषय त्यानंतर प्रकाशकाचे नाव असा क्रम नोंदविलेला होता.

## निष्कर्ष

विद्यार्थ्यांमध्ये संदर्भ शोधण्यासाठी नेमक्या कोणत्या क्रमाने शोधावा याबाबत भिन्नता होती.

**प्रश्न २) प्राथमिक आणि दुय्यम संदर्भ स्रोतांमध्ये कोणता फरक आहे?**

**निरीक्षण-** हा मुक्त प्रश्न होता. विद्यार्थीनिहाय उत्तरात भिन्नता होती. ग्रंथालयातील प्राथमिक आणि दुय्यम स्रोतांबाबत कोणीही माहिती लिहिलेली नव्हती.



**प्रश्न ३) संशोधन क्षेत्र आणि संशोधन विषयनिश्चितीसाठी कोणकोणत्या संदर्भांचा वापर कराल?**

**निरीक्षण-** बहुतांशी विद्यार्थ्यांनी विश्वकोश, नियतकालिके, एम.बी. बुच सर्व्हे, संदर्भ पुस्तके, शासकीय दस्तऐवज, ऑनलाईन संदर्भ, सेमिनार आणि कार्यशाळा अशी नोंद केलेली आहे. वेगवेगळ्या संदर्भांतून संशोधन क्षेत्र आणि संशोधन विषय निश्चित करता येतो याची त्यांना माहिती आहे.

**प्रश्न ४) संदर्भाचा शोध घेण्यासाठी इंटरनेटचा वापर करण्याची क्षमता किती आहे?**

**निरीक्षण-** निम्म्या विद्यार्थ्यांनी संदर्भ शोधण्यासाठी इंटरनेट वापराची क्षमता नाही असे म्हटले होते.

**प्रश्न ५) यूजीसीद्वारे संदर्भासाठी कोणकोणत्या सुविधा उपलब्ध आहेत याबाबत तुम्हाला कोणती माहिती आहे?**


**निरीक्षण-**यूजीसीद्वारे उपलब्ध झालेल्या संदर्भाबाबत विद्यार्थ्यांना फारशी माहिती नव्हती.

विद्यार्थ्यांमध्ये संदर्भ शोधण्यासाठी इंटरनेट आंतरज्ञानशाखीय ज्ञान आणि पूर्वज्ञानाचा समावेश करण्याची क्षमता मोजण्यासाठी पंचबिंदू विधाने देण्यात आलेली होती त्याचे विश्लेषण पुढीलप्रमाणे

**कोष्टक क्र. १.२ : संदर्भांचा शोध घेण्यासाठी इंटरनेट वापरण्याची क्षमता**

| इंटरनेटचा वापर प्रशिक्षण पूर्व / क्षमता तपासणी | | | | | इंटरनेटचा वापर प्रशिक्षणानंतर / क्षमता तपासणी | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 गुण | 2 गुण | 3 गुण | 4 गुण | 5 गुण | 1 गुण | 2 गुण | 3 गुण | 4 गुण | 5 गुण |
| 7% | 45% | 35% | 10% | 3% | 0% | 14% | 41% | 38% | 07% |

**आलेख क्र. : संदर्भाचा शोध घेण्यासाठी इंटरनेटचा वापर**





**निरीक्षण–** प्रशिक्षण देण्यापूर्वी संदर्भासाठी इंटरनेटचा वापर करण्याची क्षमता फक्त ५०% होती.

**निष्कर्ष–** प्रशिक्षणानंतर संदर्भ साहित्यासाठी इंटरनेटचा वापर करण्याच्या क्षमतेत वाढ झाली.

**कोष्टक १.३ : आंतरविद्याशाखीय वातावरणात काम करण्याची क्षमता**

| प्रशिक्षणापूर्वी आंतरविद्याशाखीय वातावरणात काम करण्याची क्षमता | | | | | प्रशिक्षणानंतर आंतरविद्याशाखीय वातावरणात काम करण्याची क्षमता | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 गुण | 2 गुण | 3 गुण | 4 गुण | 5 गुण | 1 गुण | 2 गुण | 3 गुण | 4 गुण | 5 गुण |
| 3% | 18% | 38% | 38% | 3% | 0% | 15% | 35% | 45% | 05% |







**निरीक्षण–** प्रशिक्षण देण्यापूर्वी संशोधनाबाबत आंतरविद्याशाखीय वातावरणात काम करण्याची क्षमता फक्त ५०% होती

**निष्कर्ष–** परीक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये आंतरविद्याशाखीय ज्ञानाचा समावेश करण्याच्या क्षमतेत वाढ झाली.

**कोष्टक १.४ : संशोधनात पूर्वज्ञानाचा समावेश करण्याची क्षमता**

| प्रशिक्षणापूर्वी पूर्वज्ञानाचा समावेश करण्याची क्षमता | | | | | प्रशिक्षणानंतर पूर्वज्ञानाचा समावेश करण्याची क्षमता | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 गुण | 2 गुण | 3 गुण | 4 गुण | 5 गुण | 1 गुण | 2 गुण | 3 गुण | 4 गुण | 5 गुण |
| 3% | 14% | 38% | 34% | 11% | 0% | 07% | 30% | 52% | 11% |




**निरीक्षण –** संशोधनात पूर्वज्ञानाचा समावेश करण्याची क्षमता प्रशिक्षणापूर्वी फक्त ५०% विद्यार्थ्यांमध्ये होती.

**निष्कर्ष –** संशोधनात पूर्वज्ञानाचा समावेश करण्याच्या क्षमतेत प्रशिक्षणानंतर वाढ झाली.

## मुक्त प्रश्नांद्वारे विद्यार्थ्यांचे विमर्षण

प्रत्येक दिवशी प्रशिक्षण संपल्यानंतर लगेचच विद्यार्थ्यांनी पुढील सहा प्रश्नांच्या आधारे त्यांचे त्या त्या दिवसाबाबतचे विमर्षण लिहायचे होते. त्याबाबतचे कोष्टक पुढे दिले आहे.

**कोष्टक क्र.१.५ : मुक्त प्रश्नांद्वारे विद्यार्थ्यांचे विमषण।**

| अ.क्र. | प्रश्न | दिवस | दिवसनिहाय विद्यार्थी नोंद |
|---|---|---|---|
| १. | आज मला नेमके काय समजले? | १ | संबंधित साहित्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. |
| | | ५ | संशोधनातील संकल्पनाबाबतच्या विविध स्रोत डाटाबेसेस माहीत झाले. |
| २ | आज मी काय चांगले केले? | ६ | सर्च इंजीन समजून घेतले APA - पद्धतीने संदर्भांची नोंद केली. शैक्षणिक वेबसाईट आणि संदर्भ स्रोत समजावून घेतले. |
| ३ | आज मला काय चांगले करता आले नाही? | १ | संदर्भ साहित्याचा शोध घेण्यासाठी संशोधनातील महत्त्वाचे मुद्दे ठरविता आले नाही. |
| ४ | आज मला कोणते घटक / आशय अजून माहीत होणे आवश्यक होते? | ४ व ५ | ● ऑनलाईन आढावा<br>● संदर्भासाठी योग्य वेबसाईटचा<br>● आढावा याबाबत अधिक माहिती<br>● संदर्भ पुस्तकांची यादी<br>● संदर्भाचा आढावा घेण्याचा क्रम |
| ५ | उद्या मला काय शिकायला, करायला आवडेल? | ३ | ● संदर्भ साहित्याचा आढावा कसा घ्यावा याबाबत माहिती. |
| | | ५ | ● शोधनिबंध लेखनाबाबत सखोल माहिती<br>● विविध संदर्भांची अचूक मांडणी<br>● ऑनलाईन माहिती शोध प्रक्रिया. |
| ६ | आज मला काय आवडले नाही? | २ | मा. कुलगुरुंनी दररोज किती पुस्तके वाचता हे विचारल्याबरोबर मी निरुत्तर झालो. |



## निष्कर्ष

१. विद्यार्थ्यांच्या गुणात्मक प्रत्याभरणातून मिळालेल्या माहितीच्या आधारे विद्यार्थ्यांचा प्रशिक्षणात सक्रिय सहभाग होता.
२. स्वत:च्या विविध कृतींकडे ते डोळसपणे पाहत होते.
३. स्वत:तील नकारात्मक घटकांबाबतही ते जाणीवपूर्वक नोंद करीत होते. त्यातूनच त्यांच्या मनाचा खुलेपणा लक्षात येतो.

## सर्वसामान्य निष्कर्ष

१. संशोधनात संदर्भ साहित्याचा वापर करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या स्वतंत्र प्रशिक्षणाची आवश्यकता होती.
२. संशोधनाशी संबंधित अचूक संदर्भ शोधण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रमात व्याख्यान, प्रात्यक्षिक, दिग्दर्शन, प्रत्यक्ष कृती असा क्रम ठेवणे अत्यावश्यक आहे.
३. संशोधन अहवालात संदर्भाची अचूक नोंद करण्याची क्षमता त्यांच्यात विकसित करणे गरजेचे आहे.

भविष्यात दोन दिवसांचे स्वतंत्र संदर्भ स्रोत वापराबाबतच्या प्रशिक्षणाची गरज आहे.

## सारांश

इंटरनेटमुळे जगभरातील संशोधने आंतरराष्ट्रीय संस्था, यूजीसीद्वारे संशोधकांना सहज उपलब्ध होत आहेत. संशोधनाशी संबंधित संदर्भ स्रोतांचा शोध घेण्यासाठी त्यांना स्वतंत्र प्रशिक्षणाची आवश्यकता असते.

प्रशिक्षण कार्यक्रम व्याख्यान त्यानंतर प्रात्यक्षिक या पद्धतीने केल्यास विद्यार्थ्यांमध्ये संदर्भ वापराबाबत आत्मविश्वास निर्माण होईल. त्यांचे संशोधन कार्य समाजाभिमुख असेल.

## संदर्भ ग्रंथसूची

Mahale, S. R. & Barve P.V (2014), Usability of Online resources for Academic research : A Case Study of M. Ed. Students of YCMOU, unpublished paper National Workshop on Marathwada University, Subcampus, Oamanabad

Simmonds, P.L Andaleeb, S.S. (2001), Usage of Academic Libraries: The role Service Quality, Resources and User Charateristics Paper Published in Library Trends, Vol.49. No.4, Spring 2001 pp626-634

Mahale & R. Barve P. V (2014), Professional development of Teachers and Teacher Educators. Published in Global Online Electronic International Interdiscipliery Research Journal Vol. III No. 2014.